राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय, पुणे - १

डॉ. एच. एच. चव्हाण
एम.डी.पी.एस.एम
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
ई-मेल : crs d83@yahoo.com
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१

जा.क्र. आमाजीआ/कक्ष-८३ /हरवलेली व्यक्ती मृत्यू नोंद/7956-8295/१२, दिनांक 30/10/ २०१२.

**परिपत्रक महत्वाचे**

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा,
जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू,
जिल्हा परिषद ............(सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यू , महानगरपालिका.......(सर्व)

३) मुख्याधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यू, नगरपरिषद/नगरपालिका ........(सर्व)

४) कार्यकारी अधिकारी, लष्कर विभाग............(सर्व)

विषय :- हरवलेल्या / बेपत्ता व्यक्तीच्या मृत्यूचे ठिकाणव मृत्यू दिनांक ग्राहय धरणे बाबत.....

संदर्भ :- भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र. सं./No 8/4/2011- VS (CRS)
दि. २६/ ९/२०१२.

महानिबंधक जन्म मृत्यू, भारत सरकार,नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाद्वारे हरवलेल्या व्यक्तींच्या मृत्यू नोंदणी संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनेनुसार हरवलेली व्यक्ती ७ वर्षापेक्षाचा जास्त कालावधी उलटून गेल्यानंतर न्यायालय मृत घोषित करु शकते व न्यायालयाने मृत घोषित केल्यानंतर मृत्यू नोंदणी करुन मृत्यू प्रमाणपत्र वितरित करता येणे शक्य आहे असे सूचित केले आहे. त्याप्रमाणे ज्या न्यायालयात हरवलेल्या व्यक्तीचे नातेवाईक मृत घोषित करुन घेण्यासाठी अर्ज दाखल करतील ते न्यायालय मृत्यूचे ठिकाण समजण्यात यावे व ज्या दिवशी अर्ज न्यायालयात दाखल करतील तो दिनांक मृत्यू दिनांक समजण्यात यावा. न्यायीक मान्यता न्यायालयीन आदेशाद्वारे प्राप्त असल्यामुळे जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील उशिरा नोंदणीचा कलम १३ (३) या मृत्यू नोंदणींना लागू होणार नाही.

सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त सर्व निबंधक / उपनिबंधक यांना निर्गमीत करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपसंचालक आरोग्य सेवा,
तथा उपमुख्य निबंधक,जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य , पुणे -१.

प्रत माहितीस्तव सादर :- मा.संचालक,आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचलनालय, मुंबई - ४०० ००१.